# ... ल चमत्कार.

व

साधारण उपयुक्त नियम.

भाग १

डेवीड हाईम, डी. सी. एम. यानीं तयार केला

तो

मुंबईमध्यें "इंडस्ट्रीयल" छा० छा०

आवृती १

(सर्व प्रकारचा हक्क मालकानें आपणाकडे ठेविला आहे.)

आक्टोबर संन १८७० इ०

# रा. रा. विष्णु पर्शराम शास्त्री पंडित

यांस

ग्रंथ कर्त्यानें परम प्रीतिनें, आदरानें

व

कृतज्ञतापुर्वक हें लहानसें पुस्तक

नजर केलें आहे.

# प्रस्तावना.

अद्याप मराठी भाषेचा पूर्ण उत्कर्ष न झाल्याकारणानें इतर भाषांत जसे अनेक विषयांवर उपयुक्त ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें बिचाऱ्या मराठी भाषेंत नाहींत. तिणेकरून ती अगदीं विशोभित झाली आहे. परंतु हाली नवीन विद्वानांनीं तिला सुशोभीत करण्याचें मनावर घेतल्यापासून बरेच नवीन ग्रंथ प्रसिद्धीस आले.

श्रृष्टींतील चमत्कार या विषयावर इंग्रजींत बरेच ग्रंथ आहेत व ते उपयुक्त व मनोरंजक असे मला वाटल्यावरून त्यांतून जनांच्या पंसती करितां हें लहानसें पुस्तक तयार केलें आहे.

त्रासदायक भाग गाळून यांत मनवेधक चटके मात्र घेतले आहेत. लोकांस पसंत पडल्यास पुढील भागाचें भाषांतर पुढें प्रसिद्ध करीन.

शेवटीं वागणुकीबद्दल कांहीं नियम सांगितले आहेत; ते अधीक घेणार होतों पण "स्त्री शिक्षण" नावाचा ग्रंथ लवकरच प्रसिद्धीस येईल त्यांत वाचकांस सांपडतील. व्याकरण संबंधी हा ग्रंथ नसल्या कारणानें अशुधें राहीलीं आहेत त्यांचें शुद्धपित्र दिलें नाहीं.

सर्वत्रांस इतकीच विनंती आहे कीं दोषांची क्षमा करून ग्रंथ गोड करून घ्यावा.

**डेवीड हाईम.**

# प्रार्थना.

## साखी.

" जगदोद्धारा विश्वव्यापका, करुणासिंधु दयाळा ॥
" चराचरीं तूं व्यापक असतां, काय उणें तव बाळा ॥ १ ॥
" तुझीं कृत्यें, अगणित असती, मंद मती नमी नेणें ॥
" यास्तव देवा हा भव सिंधु, उतरुनि त्वां मज नेणें ॥ २ ॥

## आर्या.

" हा ग्रंथ रूप पेला बोधांमृत भरुनि अर्पिला बाळां ॥
" आणिक जन मन रंजक ह्मणुनी, देतों, मि वृद्ध आबाळा ॥ १ ॥
" ह्या ग्रंथा, माझारी निघतिल दोषहि, असंख्य कीं कोटी ॥
" तरि बुध जन, हो तुह्मीं, घालुनि, ठेवा, समग्र, तें पोटीं ॥ २ ॥

# सृष्टींतील चमत्कार.

### विलक्षण घड्याळ.

१.—गेल्या खिस्ती शतकांत हाज नावाच्या एका यंत्रकारानें एक घड्याळ तयार केलें. त्यांत तऱ्हे तऱ्हेचे चमत्कार होत असत. ते चमत्कार त्यांतील सिध्याचा, कुत्र्याचा व मेंढपाळाचा पुतळा मिळून करीत असत. घड्याळ वाजल्याबरोबर मेंढपाळ आपल्या वाद्यावर साहा राग वाजवी व कुत्रा त्याकडे येऊन जितके वाजले असतील तेवढे वेळां भुंके. तें घड्याळ स्पेनच्या राज्याला दाखविलें. तेव्हां यंत्रकाराची कुशलता पाहून त्याला अत्यानंद झाला. घड्याळ करणाराच्या सुचनेवरून राज्यानें मेंढपाळाच्या टोपलींतुन एक फळ उचलतांच तो घड्याळांतील कुतरा इतका मोठ्यानें ओरडला कीं त्या खोलींतील राज्याचा कुत्राही ओरडूं लागला. आणखी असेंही ह्मणतात कीं, त्या घड्याळांतील शिध्याला किती तास वाजले ह्मणून विचारल्यावरून त्यानें तेथें असलेल्या सर्व जनांस समजावें ह्मणून फ्रेंच भाषेंत सांगितलें.

### सतरावर्षांतच वृद्ध होऊन मरण.

२.—सन १७५४नांत विलायतेंत एक मनुष्य सतरा वर्षें दोन महिन्यांतच वृद्ध होऊन मेला त्याचें वजन १० रत्तलांपेक्षां कधींच जास्त नव्हतें. त्याच्या आईबापांला दुसरीं सहा मुलें होतीं; पैकीं

पांच इतर मनुष्यांप्रमाणें होतीं. पण एक कनीष्ट बहीण मात्र सांगीतलेल्या पुरूषासारखी सत्राव्यावर्षीच म्हातारी झाली. यावरून परमेश्वराची कर्णी अगाध आहे.

## विलक्षण मुल.

३.—ल्युबेक मध्यें एक मुल होतें, त्याची अल्पवयांतच स्मरण शक्ती आश्चर्य करण्याजोगी होती. दहाव्या महिन्यांतच तें स्पष्ट बोलूं लागलें. बाराव्या महिन्यांत वाचूं लीहूं लागलें, व चवदाव्या महिन्यांत बरेंच ग्रंथांचे पाठांतर केलें. दोन वर्षांतच एखाद्या इतीहास कर्त्यासारखी त्याला इतीहासाची माहिती झाली. मोठमोठाल्या विद्वानांच्यानेंही त्याची बरोबरी करवत नसे, असें हें विलक्षण मुल चवथ्या वर्षांतच मरण पावलें. जर कांहीं वर्षें आणखी जगलें असतें तर कांहीं तरीं अती विलक्षण कृती करतें यांत संदेह नाहीं. पण मरणानें सर्व आटोपलें.

## अती लठ

४.—वीलायतेंत एक गोरा होता, त्याचें वजन ५५५ रत्तल होतें. त्याला महिन्यांतून दोन खुर्च्या घ्याव्या लागत; कारण त्याच्या अती वजनानें त्या तुटत.

## केसांची वाढ.

५.—मुळापासून केंस काढून, किंचीत त्याचें मुख सुईनें मोठें करून त्यांत टोंक नीट बसविलें तर केंस वाढतो; व नियमीत वेळीं म्हातारा म्हणजे पांढरा होतो.

## मोठा सर्प.

६.—सन १८१९सांत मुंबई नजीक समुद्र किनाऱ्यावर एका

तेंव्हां कुत्र्यानें तीं वस्त्रें घेऊन मोठ्या त्वरेनें पळून आपल्या धन्या जवळ नेऊन दिलीं. यावरून जनावरेंहीं, नीट वागवीलीं व शिकवीलीं असतां, मनुष्यांस देखील शहाणपणामध्यें मागें टाकतात.

## चिनी लोकांचें जेवण.

९.—आपणांपेक्षां व येथील दुसऱ्या जातीपेक्षां यालोकांचें जेवण अगदीं निराळेंच असतें. ते आपल्या हातानें किंवा चमच्यानें जेवत नाहींत, तर दोन लहान लहान काड्यानीं जेवतात, व तें जेवण व मद्य वगैरे अती उष्ण असतें किंचीत थंड झालें कीं सर्व निरोपयोगी होतें. जेवण संपलें असें दर्शवीण्याचें असलें ह्मणजे दोन हातांतील काड्या कपाळापर्यंत उचलुन मग खालीं समअंतरानें ठेवतात. आतां हें पाहून आपणांस हांसें येईल व आश्चर्यही. वाटेल, पण ज्या चाली आपणांत आहेत त्यापाहून तसेंच त्यांस वाटतें. ते ह्मणतात तुह्मीं आपल्या हातांनीं कसे जेवता? नखांचें विष तोंडांत जात नसेल? ते लोक नखांत विशेष विष आहे असें मानतात. व स्वत: तर किडे, बेडूक इत्यादी प्राणी भक्षण करतात.

## वाशींगटन.

१०.—प्रसिद्ध ग्रहस्थ वाशींगटन यांचा शेवट गेल्याशतकाच्या शेवटल्या वर्षी, शेवटल्या महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत, शेवटल्या दिवशीं, व शेवटल्या तासीं; ह्मणजे सन १७९९ मध्ये डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेस रात्रौ बारा वाजतां झाला.

## सुंदरत्वाचे विलक्षण प्रकार.

११.—जपान येथील स्त्रीया आपल्या दातांस मुलामा देतात, इंडिज मधल्या स्त्रीया दातांला तांबडा रंग देतात. व गुजराथेंतील

पांच इतर

त्याचें शरीर पडलें होतें. त्याचें वजन फारच झालें असतें. वाऱ्याच्या जोरानें तें समुद्रांत बरेंच दूर वर गेलें व त्याठीकाणीं कुजण्यास त्यास नऊ महिनें लागले.

## लांब जिव्हेची स्त्री

७.—विलायतेत एक स्त्री एका नेत्रानें आंधळी होती तिची जिव्हा इतकी लांब होती किं, तिनें ती आपले नेत्र चाटुं शकत असे. अशी मोठी जीभ मुखांत न राहूंशकल्याकारणानें तिचें मुख नेहमी उघडें असे. मार्गानें जाणारे येणारे तिची ही स्थिती पाहून भिक्षा देत, व कांहीं पैसे मिळतांच ती दारूच्या दुकानीं धांवे. नंतर बेशुद्ध होऊन मार्गीं पडे. आपल्या देशांतही असले दुर्गूणी भिक्क्षुक आहेत. अशांस भिक्षा न देणें हें बरें.

## एका कुत्र्याचें शहाणपण.

८.—एका गृहस्थाचा एक कुत्रा होता. तो धनी ज्या ज्या वस्तु सांगे त्या त्या आणी. त्या गृहस्थानें आपल्या स्नेहाला कुत्र्याचें शहाणपण दाखविण्यास एक रुपया एका दगडच्या मागें कुत्र्या समक्ष टाकला; व सुमारें एक कोशावर पुढें चालत गेल्यानंतर तो रुपया आण असें त्यास खुणांनीं दर्शवतांच कुत्रा धांवत गेला. व दगडामागील रुपया हातीं येईना ह्मणून तेथें ओरडत बसला. नंतर संध्याकाळच्या प्रहरीं कोणी दोघे ग्रहस्थ त्या मार्गानें जात होते. कुत्रा कां ओरडत आहे हें पाहाण्यास त्यांतून एकजण खालीं उतरला; व तो दगडामागिल रुपया उचलून चालता झाला. कुत्रा मुकाट्यानें त्यांमागें जाऊन ज्याठिकाणीं ते उतरले तेथेंच जवळ बसला. मग रात्रीं जेव्हां आपलीं वस्त्रें काढून ते निजावयास गेले

या काळसर दंत सुंदर मानतात. ग्रीनलंद मध्यें स्त्रीया आपल्या मुखाला निळा व पिंवळा रंग देत असत. चिनी स्त्रीया पुष्कळ त्रास भोगून करवतील तितके आपले पाय लहान करतात. याप्रमाणें निरनिराळ्या देशांत तरतऱ्हेच्या सुंदरत्वाच्या खुणा आहेत.

## चिनी लोकांच्या बायकांचे लहान पाय.

१२.—चिनी लोकांच्या बायकांचे पाय मुळापासून तसे नसतात. तर त्या मुद्दाम त्यांस लहानपणापासून तसा घाट देतात. लहान पाय करण्याची चाल केव्हांपासून निघाली याबद्दल अनेक मत्तें आहेत. त्यांपैकीं साधारण व सर्वमान्य मत्तें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत.— आपल्या बायकोला आपण संगातें असल्याशीवाय कोठें जातां येऊं नये ह्मणून एका राजानें तिचे पाय लोखंडी जोड्यांत घातले. दुसरें— तानकी नांवाची एक राणी जन्मापासून लहान पायांची होती तिनें राज्यापासून असा जाहीरनामा फिरविला कीं, तिच्या पायांच्या एवढे सर्वांनीं आपल्या मुलींचे पाय करावे. कारण ते सुंदर आहेत. लहान पाय करण्याच्या योगें मुलांस अती दुःख होतें. पण सुंदरत्वाकरितां स्त्रीया प्राण वेदनाही सोसतात. असे लहान पाय न केलें तर चालणार नाहींका? असें त्यांस विचारलें तर ते चिनी लोक ह्मणतात कीं "नाहीं तर आमच्या मुलीला चांगला नवरा मिळणार नाहीं" तेव्हां चांगला नवरा मिळण्याचें जें साधन पायांचें लघुत्व तें प्राप्त होण्यास वेदना सोसाव्या लागल्या तरीं चींता नाहीं. हें वाचून आमच्या जनांस हांसें आल्यावांचून रहावेल काय ?

## दोघे कृपण.

१३.—संन १७७८ मध्यें दोघे गृहस्थ एका खेड्यांत मरण पाव-

ले ते त्या खेड्यांत भिक्षा मागून आपला चरीतार्थ चालवीत असत व त्यांचीं वस्त्रें नुसतीं मळकट गोणपाटाचीं होतीं. शेवटीं ते वृद्धपणामुळें एक तासाच्या अंतरानें एकाच दिवशीं मेले तेव्हां त्यांच्या जवळ एकंदर १५००००० रूपये निघाले. यावरून संपत्ती ज्या जवळ आहे त्यांस सुख प्राप्त होतें असें ह्मणतात तें सर्वथा खोटें आहे. कारण वरील ग्रहस्थांजवळ पंधरालक्ष रुपये असूनही त्यांच्या उपयोगी मुळींच नव्हते. तर जो जवळ असलेल्या द्रव्याचा विचारानें खर्च करतो त्यास मात्र खरें सुख प्राप्त होतें.

### मेलेल्यांत प्राण.

१४. संन १५७१ मध्यें एकासरदाराची बायको पटकीपासून मरण पावली. तिला एका मौल्यवान आंगठीसह पुरली होती असें पाहून थडगें खणनाराच्या मनांत ती आंगठी घेण्याचें आलें; ह्मणून पुन्हां त्यानें थडगें उकरलें, तों ती जिवंत झाली नंतर ती पुष्कळ वर्षें जिवंत राहून तिला तिन मुलें झालीं.

### विलक्षण शोक.

१५.—आयेधिचा राजा **आसुफउल डावला** ज्या वेळेस गादीवर बसला त्या वेळेस त्याच्या खजीन्यांत पुष्कळ द्रव्य होतें. या नवाबाला बाग बगीचे, राजवाडे, हात्ती, घोडे, आरसे, बंदुकी वगैरे वस्तुंची अती आवड असे. दर वर्षीं तो निदान इंग्रजी सामानाकरितां २०००००० रूपये खर्ची. शंभरांच्या वर त्याचे मोठाले बाग होते, व विस राजमहाल होते ; बाराशें हत्ती व तिन हजार उमदे घोडे होते ; व मोठाले सात हजार आरसे व घड्याळें होतीं. पैकीं कांहीं घड्याळें फारच उत्तम असून सर्व हिऱ्यांनीं जडलेलीं होतीं व प्रत्येक

...सास त्यांतील पुतळे उत्तम वाजा वाजवीत असत. त्यांपैकीं दोन घड्याळें इतकीं उत्तम होतीं कीं, त्यांची त्यास ३००००० रुपये किंमत पडली, त्याच्या असल्या उत्तम वस्तुंच्या संग्रहामध्यें सुक्ष्म दर्शक यंत्र व इतर सर्व जातींचीं यंत्रें होतीं. पण कोणत्या वस्तुंत काय विशेष गुण आहे हें त्यास न समजल्या कारणानें तो मुलें ज्याप्रमाणें खेळ खेळतात त्याप्रमाणें पुष्कळ वेळ त्यांस पाहाण्यांत घालवी. "कोंबड्यास माणीक" तसें हें होय. त्याच्याजवळ एकंदर आठ कोट रुपयांचे किमतीचें जवाहिर होतें.

## जोड्यांचा मान.

१६—चिनी लोकांत जोड्यांस विलक्षण मान देतात कीं तसला प्रकार बहुशांकोठें आढळण्यांत येणे कठीण. जेव्हां एखादा न्यायाधीश एका शहरांतून दुसऱ्या शहरीं रहाण्यास जातो तेव्हां सर्व लोक त्याच्या घरापासून तो शहराच्या वेशीपर्यंत त्यास पोहोंचवीतात. मग मोठ्या सन्मानानें त्याचे जोडे काढून दरबारीं ठेवीतात. नंतर दुसरे त्याचे मित्र स्नेहभाव दर्शविण्यास नवा जोडा त्याच्या पायीं घालून सुमारें पांच मिनतांनीं काढतात. व तो जोडा फारच संभाळून ठेवतात.

## धर्माचें फळ.

१७—थोड्या वर्षांमागें मुरफील्ड मध्यें एक गरिब भिकारी होता. तो मार्गी भिक्षा मागत असे; पैकीं एक सावकार त्यास दरदिवस तीन पैसे देत असे. पण तो भिक्षुक बाकीवरच चरीतार्थ चालऊन ते तीन पैसे सांभाळून ठेवी. याप्रमाणें पुष्कळ दिवस चाललें. एके दिवशीं नित्याप्रमाणें तो तीन पैसे मागावयास गेला तेव्हां ते त्यास मिळाले नाहींत. व धन्याची उदास मुद्रा पाहून त्यानें सर्व चौकशी

करून त्यास ५००० रुपये उसने दिले. तेणेंकरून त्या सावका.
काम झालें, मग त्यानें लवकरच ते त्या भिक्षुकास परत दिले.

**चिनी लोकांची गुन्हेगारास शिक्षा करण्याची तऱ्हा.**

१८.— येथें अमलदार बहूशां भुमीवर उघडें निजवून बांबूच्या छड्या मारण्याचा हुकूम करतात, कारण ते लोक बांबूच्या छड्यांस फार भितात. पण त्या पेक्षां एक लांकडाचा खोडा केलेला असतो, तर तर फारच विलक्षण असतो. त्यांत गुन्हेगारास ते घालतात, व त्या खोड्याचा आकार बराच रूंद असल्या कारणानें, त्याला हातांनीं खातांयेत नाहीं. त्या बंदिवानाला प्रात:काळीं तुरूंगांतून काढून, ज्या मार्गानें मनूष्यें विशेष जात येत असतील, त्या मार्गी एखाद्या झाडाशीं सांखळीनें खोड्यासह बांधून ठेवतात. सारादिवस जाणारे येणारे त्याची थटा करतात.

**कागद.**

१९.—सन १६९० पर्यंत इंग्लंदांत कागद करण्याचा कारखाना नव्हता, तेंव्हां फ्रान्समधून विलायेंतत कागद येत. पण आतां जिकड तिकडे कागदाचे कारखानें होऊन सुमारें १०००००० रुपये जे तेथून फ्रान्सांत जात होते, ते देशांतच राहून हजारों लोकांचा चरी. तार्थ चालूझाला. जर आमच्या हिंदुस्थानातील जनांच्या मनांत अस. ले विच्यार येतील तर, ज्या वस्तुंकरितां विलायतेस हजारों रुपये जात आहेत ते राहून देश संपन्न होईल व जनांस उद्योग मिळेल.

**थोड्या कारणावरून महत्वाचा परिणाम.**

२०.—कित्येकवेळेस क्षुल्लक कारणावरून मनुष्याच्या मनीं जो ग्रह उत्पन्न होतो, त्याच्या योगें मोठ मोठालीं महत्वाचीं कृत्यें होतात, हें,

उदाहरणावरून समजेल. एखाद्या वस्तुची अवशक्ता जनांस असून तिची विपुलता नसली ह्मणजे त्यावस्तुची किंमत चढून तिचा व्यापार करणारांस नफा होतो, त्याप्रमाणें जरी आतां बायबल (ख्रिस्ती लोकांचें शास्त्र) अती स्वस्त झालें आहे, तरी पुर्वीं त्याला फारच किंमत पडत असे. या ग्रंथाचा व्यापार करणारांपैकीं एक थामस ग्रो नांवाचा गृहस्थ कोळसेवाल्याचा मुलगा सुमारें दोनहजार रुपयांच्या भांडवलानीशीं व्यापार करीत होता, व तो स्वतःचा चरीतार्थ ही काटकसरिनें चालवीत असल्याकारणानें बराच त्याणें द्रव्याचें संग्रह केला. मग एका स्त्रिशीं लग्न करण्याचें त्यानें ठरवीलें. व लग्नाचा दिवसही नेमला. लग्नासाठीं घरदार निट नेटकें दिसावें ह्मणून दोघां गौंड्यांस "एथपर्यंत तूटफूट निटकरून सफेती लावा" असे ह्मणून तो बाहेर गेला, इतक्यांत ज्या स्त्रिये बराबर त्याचें लग्न व्हावयाचें होतें ती तेथें आली; व दुसऱ्या एका भिंतीला खाडा होता तो निटकरण्यास तिनें सांगितलें. पण ती बाजु निटकरण्याची परवानगी नाहीं असें गवंड्यांनीं सांगीतलें. "पण मी सांगीतलें असें तुह्मीं सांगीतल्यावर ते रागावणार नाहींत" असें तिनें ह्मटल्यावरून त्यांनीं तो निट केला. पण जेव्हां हे बुवा घरीं आले, तेव्हां आपली अवज्ञा झाली असें पाहून अती क्रोधास चढले. व व्यर्थ आठ च्यार आणे ज्या स्त्रिनें खर्चले तिजशीं विवाह करूंच नये असा त्यांनीं निश्चय केला. मग दवाखाने बांधण्यांत, शाळा व पुस्तकालयें स्थापन करण्यांत, त्यानें लाखों रुपये खर्चले, व आपली किर्ती चिर्काल जगीं गाजविली.

## मोत्यांवरील रोमनलोकांची प्रिती.

२१.—इटाली देशांत रोमन लोक विख्यात होते. हे लोक लढाऊ असल्याकारणानें त्यांचें प्राबल्य पुष्कळच वाढलें होतें. त्यांस मोत्यांची आवड इतकी असे कीं, ज्याप्रमाणें आपले येथील जन सुवर्णालंकारादी लेतात त्याप्रमाणें, व किंबहुना विषेश ते मोत्यें लेत असत. उत्तम वस्त्रें ह्मटलीं ह्मणजे त्यांला मोत्यें जडलेलीं असत. व गरीबांपासून तों मोठ्यां प[illegible]त सर्व सामर्थ्यानुसार मोतेंच वापरीत. क्लीओपेटराचा प्रख्यात मोत्यांचा कानांतील लोलक १६००००० रुपयांपेक्षां आधीक किमतीचा होता. व शूर ज्युलीयस सिझरानें ब्रुटसच्या आईला जें मोतीं बक्षीस दिलें होतें, त्याची किमत त्यानें ४८०००० रुपये दिली होती. याप्रमाणें सर्वांसच मोत्यांची वांछा असल्याकारणानें स्वछ, मोठें व सुंदर अशा मोत्याची फारच किमत येत असे.

## चिनीलोकांची भाषा.

२२.—मराठी, संस्कृत, पारशी, आरबी, सींदी इत्यादी भाषांपेक्षांही ही भाषाअगदींच निराळी असल्याकारणानें, शिक्षकाला सुमारें दहा मुलांपेक्षां येथल्यासारखीं अधीक मुलें शिकावितां येत नाहींत. प्रत्येक शब्द सहाप्रकारें ह्मटला जातो, व त्याचे निरनिराळे अर्थ होतात. पाहिल्या अक्षरावर जोर दिला तर अर्थ एक होऊन, एका तऱ्हेनें लेखन केला जातो. दुसऱ्या अक्षरावर जोर दिला तर दुसरा निराळाच अर्थ निष्पन्न होतो; व दुसऱ्या तऱ्हेनें लेखन केला जातो. ह्मणजे अर्थ शब्दांवर अवलंबून आहे असें नाहीं; तर त्यांच्या उच्चारावर आहे. असें असल्या कारणानें अगदीं थोडे जन ती भाषा अवगत करून घेण्याचा प्रयत्न करतात.

से-की- ९८२



## सर्व पृथ्वींतील मोठा पुतळा.

२३.—आरोनावेटांत एका ख्रीस्ती भक्ताचा पुतळा आहे, त्यासारखा मोठा कोठेंच नाहीं. हा धातुचा पुतळाच वहातर फुटी उंच आहे. बैठक वगैरे मिळून सर्व १०३ फुटी आहे. त्याच्या डोक्यावर पंधरा वीस मनुष्यें खुर्च्या ठेऊन बसूं शकतील इतकें भव्य आहे. याला हजारों रूपये खर्च झाले असतील.

## माकडांचें च्यातुर्य.

२४.—जरी माकडें कित्येक वेळ आपलें नुकसान करतात, तरी त्यांमध्यें शहाणपण नाहीं असें समजूं नये. एके दिवशीं कांहीं लोक शीकारीस गेले होते, तेव्हां त्या मंडळींतील एका गोऱ्यानें सर्वांच्या इछे विरुद्ध एका माकडास मारलें. तें व इतर शीकार घेऊंन मंडळी घरीं परत आली. नंतर कांहीं वेळानें हजारों माकडांनीं त्यांच्या, घरासभोंवता वेढा घातला. तेव्हां भिऊन सर्व घर सोडून पळाले. द्वार उघडें पाहून त्यांपैकी एक (बहुदां त्यांचा सरदार असावा) आंत शिरून सर्व शीकार इतर तर सामान टाकून त्या मेलेल्या माकडाला कवटाळून घेऊन त्यासह सर्व निघून गेले. मग सर्वांनीं खांच खणून त्यास गाडलें केवढी तरी पशु बुद्धीही?

## मांजराच्या डोळ्यांवरून किती वाजले हें समजतें.

२५.—मांजराच्या नेत्रांवरून किती वाजले हें समजण्याची युक्ती चिनी लोकांची आहे. ते त्यांच्या नेत्रांवरून तत्क्षणीं अमुक वाजले असें सांगतात. व आपणांपैकींही सर्व सांगूं शकतील. पहा भर दोन प्रहरीं त्यांच्या नेत्रांतील बिंबळ अती बारीक ह्मणजे केसासारखी रेषा मात्र उरते

मग जसजसी संध्याकाळ होत जाते तसतसी ती वाढते. ही कु फारच उपयोगाची आहे व कदाचीत गड्याळ नसलें तरी किती वाजलें हें त्यांच्या नेत्रांवरून सांगतां येतें.

## कुंभकर्णी झोंप.

२६.—सन १७३८सांत विलायतेंत एक येलिझाबेथ आल्टन नावाची स्त्री होती. तिला ३५साव्या वर्षापासून झोंपेनें येव्हडें गाढलें कीं, चारचार दिवस पर्यंत सतत जागृत होत नसे. तिला जागी करण्यास्तव आग्नी शरीरावर ठेवला, अथवा सुया टोंचल्या तरी ती हालनचलन करीत नसे. हा एक प्रकारचा रोगच होय.

## नीट पाहिल्याशिवाय पाणी पयाल्यापासून परीणाम.

२७.—स्वीडन येथें एक स्त्री तृशाक्रांत होऊन तळ्यांतील पाणी पुरें लक्ष न पुरवींता प्याली. थोड्या दिवसांनीं तिच्या पोटांत कांहीं खालवर हालनचलन करीत आहे असा तिला भास झाला. पण काय असावें हें समजेना; ह्मणून वैद्याजवळ गेली. वैद्यानें तिचें उदर नीट पाहून तिला उलटीचा जुलाब दिला. तों तीन बेडुक व दोन लहान पानपाळी तिच्या मुखांतून पडल्या. मग तिला कांहीं बरें वाटलें. नंतर चारमहिन्यांनीं पुन्हा तिला तसेंच झाल्यावरून पुर्वीप्रमाणें करतांच ५ जिवंत बेडक्या ओकली. याप्रमाणे सात वर्षांत त्यांची संख्या एकंदर ८० झाली. या व्याधीनेंच ती बाई लवकरच यमसदनीं गेली. तरी सर्वांनीं पाणी पिण्यापुर्वीं फारच सावधगीरी ठेवावी. कोणत्यावेळेस असला प्रकार घडून येईल याचा नेम नाहीं, ह्मणून गाळल्याशिवाय पाणी पिऊंच नये यासारखें सूख नाहीं.

## कानांवरून परिक्षा.

२८.—आरीस्टाटलच्या मताप्रमाणें मोठे कान दुर्बळपणा दर्शावितात व अती लहान वेडेपणाची खुण आहे. चपटे कानाचा मनुष्य अनाडी असतो, पण चांगले कान ह्मटले ह्मणजे फार मोठे व फार लहानही नसावे. ज्याचे कान चौकोनी असतात तो दैवशाली. असले चौकोनी कान आगष्टस बादशाहाचे होते.

## ज्याचा फांस त्याच्या गळ्यांत.

२९.—इंग्लंडांत कांहींवर्षांमागें कोणी एका ग्रहस्थानें एक मेंढा चोरला, व त्याला नेण्याकरितां त्याचे मागले पाय एका ठिकाणीं बांधले. व डोक्यावर घेऊन किताल उतरत असतां मेंढ्यानें सुटण्यास प्रयत्न केल्यामुळें दोरानें बांधलेले दोन पाय गळ्यांत आले. व एका बाजुनें मेंढा व दुसऱ्या तो याप्रमाणें झाल्याकारणानें तो लटकत राहिला. गळ्यास मेंढ्याच्या वजनानें फांस घट्ट बसून बुवांनीं लवकरच स्वर्गाचा मार्ग धरिला. वाईटाचा वाईटच परिणाम.

## विलक्षण सर्प बुद्धी.

३०.—ज्या वेळेस हिंदुस्थानांत इंग्रज लोक नवीनच आले होते तेव्हां एका गोऱ्याजवळ मद्रासेत एक सर्प होता. त्यावर त्याच्या धन्याची फार ममता होती. नंतर जेव्हां फ्रेंच लोकांनीं मद्रास घेतली, तेव्हां त्यांनीं तो सर्प पांडीचरींत नेला. पण तो संधी पाहून मद्रास पांडीचरीहून शंभर मैलांवर असतांही परत आपल्या पहिल्या धन्याच्या येथें गेला.

## अती विलक्षण प्रजन्य.

३१—.आपल्या हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागापेक्षां विलायतेंत बे-

शेष थंडी असते. तेथें प्रजन्य नेहमी पडतो पण १८०८ ३ ज्यानेवारी महिन्यांत प्रज्यन्य इतका थिजला कीं छत्र्या वंदहोईनास्या झाल्या पक्ष्यांच्या पंखांवर उदक थिजून ते उडण्यास असमर्थ होऊन भूमिवर पतन पावले. असली थंडी आपल्या लोकांनीं स्वप्नींही पाहिली नसेल.

## अत्तर.

३२.—कदाचीत कोणाला वाटेल कीं आतांच लोक चांगली अत्तरें करण्यास शिकले ; तर हें सर्व खोटें आहे. कारण आल्नवीक येथील वस्तूसंग्रहाच्या ठिकाणीं सूमारें तीन हजार वर्षां पूर्वीचें अत्तर आहे. तें आझून ही इतकें उत्तम आहे कीं, हालीच्या काळांत क्वचितिच तसें होईल.

## नवरा मीळविन्या करितां विलक्षण प्रयत्न.

३३.—सूमारें पन्नासवर्षां पूर्वीं वीलायतेंतील वायका केंस चांगले दिसावे ह्मणून, दूसरे केंस आपल्या केसाबरावर बांधीत; व तेणें करून चांगल्या केंसांची किमत ही फार होई, हें व स्त्रिया आपला निश्चय पूर्ण कर्ण्यास काय न करतील याचा नेम नाहीं या दोन गोष्टी पूढील उधाहारणावरून सजतील.

कोणी एका स्त्रीला वरण्याचें एका पुरूषानें नाकारलें. कारण तो ह्मणाला कीं तिच्याजवळ ५०० रूपये असल्याशिवाय मी तिजशीं लग्न करणार नाहीं. त्या स्त्रिये पाशीं ती रक्कम नसल्याकारणानें ती निरूपाय झाली. पण पूढें ऐका दूसऱ्या स्त्रिला तिनें आपले केंस ३० रूपये आंसाप्रमाणें ६०० रूपयांनीं विकले. व त्या पूरूषाशीं लग्न केलें.

## ावरांची भाषा.

आपणांस एकमेकांचे विचार समजावे ह्मणून प्रभुवरानें वाचा दिली आहे. तिच्या योगें आपण स्वतःचे विचार प्रदर्शीत करूं शकतों. पण जनावरें ज्यांस आपणांप्रमाणें वाचा नाहीं त्यांस ही आपले विचार आपल्या जातीच्यांस समजविण्याची शक्ती दिली आहे हें पुढील उदाहरणावरून समजेल. एक गृहस्थ कोठें बाहेर गांवीं जात होता, तेव्हां त्यानें आपला कुत्रा एका गृहस्थाच्या येथें ठेवला. त्याच गृहस्थाचा दुसरा कुत्रा होता, त्याचें व या कुत्र्याचें भांडण होऊन ठेवलेल्या लहान कुत्र्याला त्यानें बरेंच जखमी केलें. नंतर तो हाळूहळू चालून सुमारें चार कोशांवर त्याच्या धन्याचें घर होतें तेथें जाऊन बरा होऊन पुष्कळ महिन्यांनीं त्याच्या ओळखीचा दुसरा मोठा कुत्रा होता तो घेऊन आला. व आपला सुड उगविला.

## स्त्रियांचे

प्रसीद्ध राजा आकबर याचा पुत्र ज्याहांगीर (ह्मणजे पृथ्वी जिंकणारा) याची प्रिती नुरजाहान (ह्मणजे पृथ्वीचा उजेड) नावाच्या सुंदरीवर फार बसली होती. आकबरानें तें नापसंत केलें. पण त्याच्या मर्णानंतर ज्याहांगिरनें त्या सुंदरीला वरलें. ही सुंदरत्वांत त्याप्रमाणेंच गुणांतही निपून होती. इच्यासारख्या शूर स्त्रिया विराळाच. गुलाबाच्या फुलांचें अत्तर काढण्याची युक्ती इनेंच काढली. एकासमयीं राजा व सरदार मंडळी शिकारीस गेली होती, तेव्हां ही ही त्यांबराबर होती. तिनें च्यार उग्र व्याघ्र हात्तीवरून भाल्यानें मारले कीं ज्यापुढें जाण्यास एकाही सर-

दाराचें धैर्य झालें नाहीं. पण ही अ सर्व गुण स
असतांही तिला अती महत्वाकांक्षी असल्यानें तिचा परिणाम
फार वाईट झाला.

## पाण्यावर तरतें शहर.

या पृथ्वींत कायकाय चमत्कार आहेत याचा नेम नाहीं. व त्यांविषयीं आपणा मानवांस क्वचीतच माहिती आहे. सायामची राजधानी ब्यानकाक हें शहर सतत पाण्यांत तरतें आहे. ज्या नदींत हें शहर आहे तिजकडे अवलोकन केलें असतां जसी कांहीं निरनिराळ्या तऱ्हेचीं तीं जहाजेंच आहेत. असें वाटतें तीं घरें बांबुच्या साऱ्यांवर तरतात. त्यांची संख्या सर्व मिळून सत्तर हजार आहे समोरच्या बाजूस निट नेटकीं व तरतऱ्हेच्या रंगाविलेल्या घरांत दुकानें आहेत. त्यांच्यामागें ओळीनें मोठें उत्तम देवालय आहे. तें त्या शहराचा कोणी बलाढ्य राजा होऊन गेला, त्याच्या स्मरणार्थ बांधलें आहे. त्यामागेंच सायमी लोकांचा राजा रहातो होडींतून घरांत जातां फार सांभाळलें पाहिजे; नाहींतर झोकामुळे आपण तत्क्षणीनदींत पडूं. रात्रंदिवस पाण्यांत रहाण्याचें असल्या कारणानें अल्प वयापासूनच त्यांचीं मुलें पोहोंण्यास शिकतात. व तेणेकरून प्रौढ होत तों उत्तम पोहोंणार होतात. शेकडो होड्या व जहाजें मधून व बाजूनें जातात येतात तेणेकरून नेहमी घरें उपडीं होतात. पण सर्वांस चांगलें पाहोतां येतें असें समजून आजुबाजूस कोणी बुडत असल्यास कोणीही त्यास मदत करीत नाहीं.

वीलक्षण वसाहात यांत संदेह नाहीं.

## ल ओमार.

बादशहाने बांधलेलें देऊळ.

पुर्वी संपन्न, चतुर व बलाढ्य असा इस्त्रायल लोकांचा राजा सालमन ह्मणून होऊन गेला. त्यानें त्या लोकांकरितां अती उत्तम मसीद बांधली होती. पुढे जेव्हां येरूशालेम टायटसनें घेतली त्यावेळीं त्या मसीदीचा समुळ नाश झाला. नंतर ओमार बादशाहानें येरूशालेम घेतली तेव्हां त्या उत्तम ठिकाणीं मुसलमान लोकांकरितां त्यानें अतिउत्तम अशी मसीद बांधली. इच्याभींतींस रूपेरी व सोनेरी मुलामादिला आहे. तिजवरील कवलें हिऱ्यांप्रमाणें चमकतात. या सारिखें शोभायमान प्रार्थनेचें मंदीर क्वचीत आढळेल असें ह्मणतात.

**इंग्रजलोकांची आंगठ्यांची घालण्याची तऱ्हा व त्याचा अर्थ.**

ज्याचा लग्न करण्याचा हेतु आहे तो पहिल्या ह्मणजे डाव्या हाताच्या आंगठ्यांत आंगठी घालतो. सोयरीक पाहिलेली असल्यास दुसऱ्यांत; लग्न झालें असल्यास तिसऱ्यांत, व लग्न केव्हांच करण्याचा हेतु नसला तर चौथ्यांबोटांत आंगठी घालतो.

## वागणुकीबद्दल नियम.

साधारणपणे आपण कसें वागावें हें जाणणें अती महत्वाचें आहे. तशांत अल्प वयस्क जनांस सभ्य रितिभाती माहीत नसल्या कारणानें पुष्कळ त्यांस अडचण पडते. ह्मणून कांहीं सुचना पुढें लिहीतों. त्या जरी पुर्णतानाहींत व त्यांच्या योगें जरी वर लिहीलेल्या हेतु सर्वस्वी साध्य होणार नाहीं, तरी कांहीं अंशीं तरी पुढील भाग उपयुक्त होईल या हेतुनें लिहीला आहे.

दुसऱ्याच्या कामी अपणच [illegible] ालूं नका[illegible] वेळां असें आपल्या आढळण्यांत येतें कीं चारचौघे मिळाले क[illegible] कोणी एखादा तेथें नसेल त्याबद्दल बोलूं लागतात. "तो असें करतो" "उद्यां एक मोठा घोडा घेणार आहे" या प्रमाणें त्यांचा कांहीं संबंध नसतांही व्यर्थ जसा गुन्हेगार हजर नसतां त्याचा खटला चालवावा, त्याप्रमाणें बडबड करण्यांत वेळ घालवितात हें अगदीं वाईट आहे. पहा हें खचित आहे कीं जो गृहस्थ तुमच्या समागमें दुसऱ्याच्या कुटाळ्या करतो, तो तुमच्या पश्चात तुमच्या करण्यास मागें पुढें पहाणार नाहीं.

खोटें बोलूं नको—सत्यापरतें सुख नाहीं. जो खोटें बोलून दुसऱ्यास फसऊं पहातो तो स्वत: फसतो. जो स्वत: लबाड आहे त्यास, जसें हिरवा चष्मा लावणारास सर्व कांहीं हिरवेंच दिसतें, तसें त्यास सर्व जग खोटें व आपणाप्रमाणेंच दिसतें. मग कोणाच्याही बोलण्यावर त्याचा भरंसा न बसल्या कारणानें सर्व कामीं घोंटाळा होतो.

कोणाच्याहीकरितां आपलें बोलणें फिरऊं नको—एक वेळ जें बोललों तें केंव्हांच नाकारूं नये. कारण तेणें करून कदाचित ज्यासाठीं खोटें बोलतों त्याच्या प्रितींतला होईन असें तुह्मांस वाटेल, पण तुमचें वजन कमी होईल, व जन हलकट समजतील.

संभाषण— मंडळीस रुचे असें संभाषण करावें, नाहींतर हलकट विचारानीं व शब्दांनीं कोणी ही आपणांस चांगलें ह्मणणार नाहीं; इतकेंच नाहीं तर पुढें चांगल्या मंडळींत आपणांस कोणीं उभेंही करणार नाहीं.